Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ११] मंगळवार, डिसेंबर ६, २०२२/अग्रहायण १५, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १७.

जिल्हाधिकारी, यांजकडून

भुमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.—

क्रमांक अ. का-उविअभं-भूसं.-कावि-७५५-२०२२.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक सिरस्ते -उविअभं-भूसं-कलि-कावि-४५३-२०२१, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोनमध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे.

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि, म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, भंडारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन मामला क्रमांक २-अ-६५-२०२१-२०२२, गाव धामणी, त.सा.क्र. २०, तालुका पवनी, जिल्हा भंडारा

अनुक्रमांक	सर्व्हे क्र. किंवा गट क्र.	संपादनाखालील क्षेत्र (अदमासे)
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	१४५	० ०१
२	३८	० २४
३	३६	० ३७
	एकूण संपादनाखालील क्षेत्र . .	० ६२

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:	गोसीखुर्द प्रकल्प.
प्रकल्पाचे वर्णन	:	विरली बु., लघु कालवा क्र. १ व धामणी लघु कालव्यावरील धामणी उपलघु कालवा बांधकामाकरिता.
समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)	:	गोसीखुर्द प्रकल्पाद्वारे सिंचन, पिण्यासाठी पाणी पुरवठा, औद्योगिक पाणी पुरवठा, मत्स्य व्यवसाय व जलविद्युत निर्मिती.

अनुसूची-तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

– निरंक –

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

– निरंक –

टीप : उक्त जमिनीच्या आराखडयाचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी, भंडारा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

भाग १ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १८.

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.—

क्रमांक अ.का-उविअभं-भूसं.अ.२०१३-कलि-कावि–७५४-२०२२ .—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक सिरस्ते -उविअभं-भूसं-कलि-कावि-४५४-२०२१, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, भंडारा जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटलेली आहे.

आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि, म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-याची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, भंडारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन मामला क्रमांक ३-अ-६५-२०२१-२०२२, गाव इसापूर, त.सा.क्र. २३, तालुका पवनी, जिल्हा भंडारा

अनुक्रमांक	सर्व्हे क्र. किंवा गट क्र.	संपादनाखालील क्षेत्र (अदमासे)
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	४०८/१	० ०२
२	४०८/२	० १५
३	४१४/१	० ०९
	एकुण संपादनाखालील क्षेत्र . .	० २६

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:	गोसीखुर्द प्रकल्प.
प्रकल्पाचे वर्णन	:	गोसेखुर्द डावा कालवाचे विरली बु., लघु कालवा क्र. १ व इसापूर वितरिका व त्यावरील लघु कालव्याच्या मातीकाम व बांधकामाकरिता
समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)	:	गोसीखुर्द प्रकल्पाद्वारे सिंचन, पिण्यासाठी पाणी पुरवठा, औद्योगिक पाणी पुरवठा, मत्स्य व्यवसाय व जलविद्युत निर्मिती.

अनुसूची-तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

– निरंक –

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनचा सारांश

– निरंक –

टीप : उक्त जमिनीच्या आराखडयाचे भूसंपादीत जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी, भंडारा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

योगेश कुंभेजकर,
जिल्हाधिकारी ,
भंडारा.

भंडारा :
दिनांक २५ नोव्हेंबर २०२२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.